महाराष्ट्र शासन

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती**

प्लॉट पी -१०७ एम.आय.डी.सी.आवार, महिला रुग्णालयासमोर, बारामती पिन नं. ४१३१३३

Email-admgmcbaramati@gmail.com Ph : 02112-244172

जा.क्र.पुअहोशावैमबा/आस्था-राजप/प्रा./सह.प्रा/जाहिरात/करार/२४७१/२०२६ दिनांक १५/०७/२०२६

# जाहिरात

विषय-वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील पु.अ. होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती वैद्यकीय अध्यापन व रुग्णसेवा याकरीता चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या सवंर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत ३६४ दिवसांकरीता करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत...

संदर्भ-१)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागक्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३/, दि.१७/१२/२०१६.

२)वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक एलईसी-२०२१/प्र.क्र.१९९/वैसेवा-३, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२२.

३)वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,शासन निर्णय क्रमांक:एलईसी-२०२४/प्र.क्र.१८१/वैसेवा-३, दिनांक २१ ऑगस्ट, २०२४.

४)संचालनालयाचे परिपत्रक क्र.DMER-१३/७१/२०२५-EST-२/७२५५,दि.२२/१२/२०२५.

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील पु.अ. होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे वैद्यकीय अध्यापन व रुग्णसेवा याकरीता चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या सवंर्गातील रिक्त असलेली पदे संस्थास्तरावरुन करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता निव्वळ व तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याकरीता इच्छूक पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

त्यानुसार सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या www.med-edu.in या संकेतस्थळावर तसेच या कर्यालयाच्या www.gmcbaramati.org या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. इच्छुक उमेदवारांनी अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन घ्यावा व सदर अर्ज अचुक व परिपुर्ण भरुन त्यासोबत सोबत जोडलेल्या यादीतील क्रमवारीनुसार आवश्यक त्या शैक्षणिक/अनुभव व इतर साक्षांकित कागदपत्रे/प्रमाणपत्रे जोडून (अर्ज व अर्जासोबतची सर्व कागदपत्रे/दस्तऐवजे द्विप्रतीत सादर करावीत.) अर्ज पु.अ.हो. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि.२२/०७/२०२६ ते दि.३०/०७/२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत (शासकीय सुट्टी वगळून) या कार्यालयात प्रत्यक्ष अथवा पंजीकृत डाकेने सादर करण्यात यावा. अर्ज ऑफलाईन पध्दतीने स्विकारले जातील.

प्रत्यक्ष मुलाखत दि.३१/०७/२०२६ रोजी ठिक ११.०० वाजता मा.अधिष्ठाता, पु.अ.हो. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे परिषद हॉल दालनात आयोजित करण्यात आली आहे. नियुक्तीबाबतची माहिती मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, आयुष, मुंबई यांच्या www.med-edu.in या संकेतस्थळावर तसेच या कार्यालयाच्या www.gmcbaramati.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रांसह साक्षांकित केलेल्या प्रतीसह थेट मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर राहावे. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास उमेदवारांचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

अधिष्ठाता,
पु.अ.होळकर शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, बारामती.

Scanned by Camera Scanner

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती.

रिक्त पदांचा तपशील संवर्ग- प्राध्यापक

| अ. क्र | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव/अर्हता/पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | त्वचा व गुप्तरोग | १ | MD(Dermatology and venereology)/ MD (Dermatology, venereology and leprosy)/ MD Dermatology including venereology)/ MD Dermatology including venereology/ leprosy)/ MD (medicine with D.V.D or D.D./DNB (dermatology and venereology) | As per NMC notification 14.02.2022 & 30.06.2025<br>(a) (i) Associate Professor in the subject for three years in a recognised medical institution; or<br>(ii) Specialist Medical Officer of the Armed Forces having at least three years of experience as Associate Professor in the relevant speciality in a teaching hospital of the Armed Forces; and<br>(b) (i) have published at least two research publications after becoming Associate Professor and must be amongst the first three authors;<br>(ii) have completed the Basic Course in Biomedical Research from a recognised medical institution; and<br>(iii) shall be required to undergo Basic Course in Medical Education provided their broad specialty subject is covered under undergraduate training.<br>Note 1: In the case of Aviation Medicine and Marine Medicine, two years of experience as Flying Squadron for Aviation and two years of experience in a Diving and Escape Training School for Marine medicine, shall be Considered equivalent to one-year teaching experience as Associate Professor.<br>Note 2: A Senior Consultant, having three years of experience as post graduate teacher of broad specialty or super specialty subject in the National Board of Examination in Medical Sciences recognised Government medical institute shall be eligible to become Professor in a recognised medical institution of the concerned specialty and total number of years of experience as Post Graduate teacher in National Board of Examination in Medical Sciences recognised government medical institute shall be considered as experience as Professor in a recognised medical institution. |
| २ | जीवरसायनशास्त्र | १ | M.D.(Biochemistry) / DNB(Biochemistry)/ Bachelor of Medicine and Bachelor of Surgery with Master of Science (Medical Biochemistry) or Master of Science(Medical Biochemistry) with doctor of Philosophy (Medical Biochemistry) or Master of Science (Medical Biochemistry) with Doctorate in science (Medical Biochemistry) | |
| ३ | सुक्ष्मजीवशास्त्र | १ | M.D.(Microbiology) / DNB (Microbiology)/ MSc (Medical Microbiology) with PhD in Medical Microbiology | |
| ४ | शरीरक्रियाशास्त्र | १ | M.D. (Physiology)/MBBS with M.Sc. (Medical Physiology)/ M.Sc. (Medical Physiology) with Ph.D. Medical Physiology/ M.Sc. Medical Physiology with D.Sc. Medical Physiology /DNB. | |
| ५ | शल्यचिकित्साशास्त्र | १ | M.S.(General Surgery)/ DNB (General Surgery) | |
| ६ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | १ | M.S.(Orthopedics)/ DNB (Orthopedics) | |
| ७ | क्षयरोगशास्त्र | १ | M.D.(Pulmonary Medicine)/ DNB (Pulmonary Medicine) | |
| ८ | मनोविकृतीशास्त्र | १ | MD.(Psychiatry)/ MD (Psychological Medicine)/ MD (Medicine with Diploma in psychological Medicine)/ DNB (Psychiatry) | |
| ९ | औषधवैद्यकशास्त्र | १ | M.D.(General Medicine)/ DNB (General Medicine) | |
| १० | कान-नाक व घसाशास्त्र | १ | M.S.(Oto-Rhino-Laryngology) DNB (Oto-Rhino-Laryngology) | |
| ११ | बालरोगचिकित्साशास्त्र | १ | M.D.(Paediatrics)/ DNB (Paediatrics) | |
| | एकुण | ११ | | |

Scanned by Camera Scanner

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती.

रिक्त पदांचा तपशील                                    संवर्ग – सहयोगी प्राध्यापक

| अ.क. | विषयाचे नांव | रिक्त पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | सुक्ष्मजीवशास्त्र | १ | M.D. (Microbiology) / DNB (Microbiology)/ MSc (Medical Microbiology) with PhD in Medical Microbiology | As per NMC notification 14.02.2022 & 30.06.2025<br>(a) (i) Assistant Professor in the subject for four years in a recognised medical institution or for five years for those appointed directly as Assistant Professor in Government medical institution; or<br>(ii) a Specialist Medical Officer of the Armed Forces, having at least five years of clinical experience in the relevant specialty after obtaining the recognised Postgraduate qualification in the subject, of which at least three years teaching experience as Assistant Professor in a teaching hospital of the Armed Forces; and<br>(b) (i) have published at least two research publications after becoming Assistant Professor and must be amongst first three authors;<br>(ii) have completed the Basic Course in Biomedical Research from a recognised medical institution designated by the Commission; and<br>(iii) shall be required to undergo Basic Course in Medical Education provided their broad specialty subject is covered under undergraduate training.<br>Note 1: In the specialty of Aviation Medicine and Marine Medicine, maximum of four years' experience in Flying Squadrons and in Diving and Escape training Schools, respectively, will be considered equivalent to two years of teaching experience for becoming Associate Professor.<br>Note 2: A non-teaching Consultant or Specialist or Medical Officer, possessing postgraduate medical degree with ten years of experience in at least 220 bedded Government hospital shall be eligible to<br>become Associate Professor of that broad specialty and on such appointment, shall be required to undergo Basic Course in Medical Education and Basic Course in Biomedical Research within two years of the appointment. |
| २ | न्यायवैद्यकशास्त्र | १ | M.D (Forensic Medicine/ DNB (Forensic Medicine) | |
| ३ | शल्यचिकित्साशास्त्र | १ | M.S (General Surgery/ DNB (General Surgery) | |
| ४ | बधिरीकरणशास्त्र | १ | M.D. (Anesthesiology)/ DNB (Anesthesiology) | |
| ५ | कान-नाक व घसाशास्त्र | १ | M.S.(Oto-Rhino-Laryngology) DNB (Oto-Rhino-Laryngology) | |
| ६ | क्ष किरणशास्त्र | १ | M.D. (Radio-diagnosis/ M.D. (Radiology)/ DNB (Radiology) | |
| ७ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | १ | MS (Orthopedics)/ DNB (Orthopedics) | |
| ८ | औषधवैद्यकशास्त्र | २ | M.D.(General Medicine)/ DNB (General Medicine) | |
| | एकुण | ०९ | | |

टिप : सदर जाहिरातीमधील नमुद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पुर्णपणे रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वत: कडे राखून ठेवला आहे.

अधिष्ठाता,
पु.अ.होळकर शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, बारामती.

Scanned by Camera Scanner

**महत्वाची टिप:**

१) उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२) उमेदवाराचे वय नियुक्ती वेळेस कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३) प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

<u>४) मानधन:</u>

अ) सेवानिवृत्त अध्यापकांची करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास त्यांना वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एलईसी-२०२४/प्र.क्र.१८१/वैसेवा-३, दिनांक २१.०८.२०२४ मधील तरतुदीनुसार दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

ब) खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) यांना खालील नमुदप्रमाणे दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

| अ.क्र. | पद | विषय | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन- बारामती | रु.२,००,०००/- |
| २ | सहयोगी प्राध्यापक | चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन - बारामती | रु.१,८५,०००/- |

५)प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदासाठी अर्ज करणाऱ्या अध्यापकांना NMC (राष्ट्रीय वैद्यकीय परिषद) च्या मानकानुसार कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.तसेच भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार शोधनिबंध व इतर पात्रता आवश्यक राहील.

**गुणांकन पध्दत:** जाहिराती सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमुद करण्यात आलेली आहे.

(१) परिशिष्ट-अ मध्ये नमूद नुसार अ.क्र. १ ते ४ वरील एकूण ८५ गुणांच्या आधारे तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करुन त्यानुसार उमेदवारांना प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.

(२) प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखती अंती १०० गुणांपैकी किमान ४१% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच करार तत्वावरील नियुक्तीकरीता विचार केला जाईल.

**नियम व अटी :**

१) करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील. तथापी सदरहु पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.

२) उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.

३) करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षीत कामे पार पाडणे आवश्यक राहील.

Scanned by Camera Scanner

४) वरीलप्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबादाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधीत कोंणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

६) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील.

७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

८) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकाराचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९) उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकरला जाणार नाही.

१०) विगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११) अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरीकदृष्टया पात्र असल्याने वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२) सदर जाहिराती मधील नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पुर्णत: रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता स्वत:कडे राखून ठेवला आहे.

१३) नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता राहतील.

१४) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणताही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

१४) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

१५) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१७) मुलाखतीला येताना उमेदवारांनी ऑफलाईन सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

Scanned by Camera Scanner

परिशिष्ट-अ

| Sr. No. | Topic | Marks |
| --- | --- | --- |
| 01 | 1.MS/MD/Mch/DNB-10 Marks<br>2.MBBS (Aggregate Marks of all years)<br>65% to 70% and above-20 marks<br>60% to 65% and above-15 marks<br>55% to 60% and above-10 marks<br>50% to 55% and above-05 marks<br>3.XII th (Aggregate Marks )<br>70% to 80% and above-20 marks<br>60% to 70% and above-15 marks<br>50% to 60% and above-10 marks<br>40% to 50% and above-05 marks | 50 |
| 02 | Additional Qualification in Concerned Subject (DNB/CPS/PHD/Fellowship) | 05 |
| 03 | Teaching Experience in Concerned Speciality Mandatory | 20 |
| 04 | Research Paper Publication (Mandatory) | 10 |
| 05 | Interview | 15 |
| | Total | 100 |

अधिष्ठाता,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,बारामती

प्रति,
१.कार्यालयीन संकेतस्थळ, मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
२.सुचना फलक, पु.अ.हो.शा.वै.म., बारामती.

प्रत- माहितीस्तव सविनय सादर
१.मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत-
१.सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
२.संबंधित प्राध्यापक व विभागप्रमुख, पु.अ.हो.शा.वै.म., बारामती.
३.रोखपाल, रोख शाखा, पु.अ.हो.शा.वै.म., बारामती यांना आदेशित करण्यात येते की, इच्छुक असलेल्या प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक उमेदवारांकडून (शासकीय सुट्टी वगळून) या कार्यालयातून जाहिरातीच्या दिनांकापासून विहित कालावधीत अर्जाचे शुल्क रु.२००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.
प्रत-
श्री.राहुल रोकडे, निम्नश्रेणी लघुलेघक, पु.अ.हो.शा.वै.म., बारामती यांना आदेशित करण्यात येते की, सदरची जाहिरात दि.२२/०७/२०२६ रोजी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

Scanned by Camera Scanner